३२०५८।६

तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-३/१२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१३

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- 2 DEC 2013

प्रति

अध्यक्ष/सचिव,

पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, बलार्ड इस्टेट, मुंबई-१

विषय - सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र.स्वयंअ-२०१३/(८५/१३)(II)/माशि-१ दिनांक ०५ ऑक्टोंबर २०१३.

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुस आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १७३ | पुणे | पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, बलार्ड इस्टेट, मुंबई-१ | पवार पब्लिक स्कूल, नांदेड सिटी स.नं.२२ सिहंगड रोड , ता. हवेली | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक | २०१३-१४ |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून असेल.

४. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

५. परवानगी मिळालेपासून १८ (अठरा) महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्दबातल ठरेल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता विहित नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.

१०. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा / वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यकराहील.

११. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा.सु.न.जोशी,अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

Principal
PAWAR PUBLIC SCHOOL NANDED CITY

**तात्काळ**
कालमर्यादित

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४/स्वयंअशाळा इरादापत्र/पुवि/२०१६-२०१७/४५४२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : 25 APR 2023

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट,बलार्ड स्टेट,मुंबई-०१

विषय : सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ परवानगी चे अनुषंगाने आदेश निर्गमित करणेबाबत

संदर्भ : १. महाराष्ट स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२
२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मुंबई क्र. नाहप्र-२००९ (६६३/०९) माशि-१,दि. २०.६.२०१२
३.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निणूय क्रमांक एसएफएस-१०१७/प्र.क्र. ११३/एसएम-२ , दि.२.५.२०१७
४.मुख्याध्यापिका , पवार पब्लिक स्कूल, नांदेड सिटी सिंहगड रोड पुणे यांचे जा क्र पीपीएसएनसी/ओडब्ल्यू/२०२३/१४८९ दिनांक २०.४.२०२३
५.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचे पत्र जा क्र जि प/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/८०१/२६६०,दिनांक २०.४.२०२३

वरील विषयी संदर्भीय क्र. ४ नुसार मुख्याध्यापिका, पवार पब्लिक स्कूल नांदेड सिटी यांनी विनंती केलेली आहे की, संदर्भीय क्र. ३ चे शासन निर्णयानुसार त्यांचे शाळेस सन २०१६-२०१७ मध्ये शाळा परवानगी मिळालेली होती. तथापि सदर प्रस्तावाचे अनुषंगाने या कार्यालयाचे आदेश प्राप्त नाहीत. तदनंतर संदर्भीय क्र. ५ नुसार या कार्यालयाचे स्तरावरुन पुढील कार्यवाही होणेस विनंती केलेली आहे.संदर्भीय क्र. ४ चे पत्राचे विनंतीचे अनुषंगाने खालीलनुसार पवार पब्लिक स्कूल नांदेड सिटी स नं २२ सिंहगड रोड ता हवेली जि पुणे या शाळेस संदर्भीय क्र. ३ चे शासन निर्णयातील मुददा क्रमांक ५ नुसार आदेश निर्गमित करीत आहोत.

संदर्भीय क्र. ३ चे शासन निर्णयानुसार सदर शाळेस परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (२०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

तसेच संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम २००९ मधील तरतुदींची पूर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(औदुंबर उकिरडे)
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग पुणे-१.**

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे

प्रत : माहितीसाठी सविनय सादर
१. मा.अवरसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

Principal
PAWAR PUBLIC SCHOOL NANDED CITY
Sinhagad Road, Pune 411041